# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र.रानिआ/नप-२०१८/प्र.क्र.१/का-६
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ४/०४/२०१८.

प्रति,

रत्नागिरी, पुणे, सांगली, सोलापूर, कोल्हापूर,
जळगाव, औरंगाबाद, नांदेड व यवतमाळ.

विषय :- **नगरपरिषदा/नगरपंचायतींच्या सार्वत्रिक व पोट निवडणुका एप्रिल-२०१८ मतमोजणीच्या दिनांकामध्ये बदल करण्याबाबत...**

संदर्भ :- १. राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि.०५/०३/२०१८रोजीचे पत्र.
२.राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि.०२/०४/२०१८ रोजीचे पत्र.

महोदय,

राज्य निवडणूक आयोगाने उपरोक्त संदर्भाधिन पत्रान्वये दि.०५/०३/२०१८ च्या पत्रान्वये सोबतच्या परिशिष्ट -२ मधील नमूद ६ नगरपरिषदा/नगरपंचायतींमधील सदस्य व अध्यक्ष पदांच्या सार्वत्रिक व रिक्त पदांच्या पोट निवडणुकांकरिता निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला होता. या कार्यक्रमानुसार मतदान दि.०६/०४/२०१८ व मतमोजणी दि.०७/०४/२०१८ रोजी घेण्याचे ठरविले होते.

२. कणकवली प्रभाग क्रमांक १०, जामनेर प्रभाग क्र. ७-ब, देवरुख व गुहागर नगरपरिषदेच्या काही प्रभागांमध्ये नामनिर्देशनपत्रांच्या छाननीअंती व्यथित झालेल्या काही उमेदवारांनी संबंधित मा. जिल्हा न्यायालयात अपिल दाखल केले होते, ज्याचा निकाल दि.२८ ,२९ व ३१,मार्च,२०१८ रोजी लागलेला आहे. या निकालानुसार देवरुख,गुहागर,कणकवली प्रभागक्र.१०, जामनेर प्रभाग-७ मध्ये मतदानाचा सुधारित दिनांक ११/०४/२०१८ व ४ नगरपरिषद/नगरपंचायतीमध्ये मतमोजणीचा सुधारित दिनांक १२/०४/२०१८ जाहीर करण्यात आलेला आहे. (संदर्भीय पत्र क्र.२ दि.०२/०४/२०१८ अन्वये)

३. या दोन आदेशांमुळे वैजापूर नगरपरिषद व आजरा नगरपंचायतीची तसेच इतर नगर परिषदा/नगर पंचायतींमधील रिक्त पदांची मतमोजणी दि.०७/०४/२०१८ रोजी व देवरुख,गुहागर व

कणकवली या नगरपंचायतींची व जामनेर नगरपरिषदेची मतमोजणी दि.१२/०४/२०१८ रोजी होणार आहे.

४. कोल्हापूर जिल्हयातील आजरा नगरपंचायत व औरंगाबाद जिल्हयातील वैजापूर नगरपरिषद व इतर नगरपरिषद/नगरपंचायतीमधील रिक्त पदांचा निकाल (दि.०७/०४/२०१८) लागल्यानंतर देवरुख, गुहागर व कणकवली मधील प्रभाग क्र.१० या नगरपंचायतींमध्ये तसेच जामनेर नगरपरिषदेच्या प्रभाग क्र.७ मध्ये मतदान दि.११/०४/२०१८ रोजी होणार आहे. त्यामुळे दिनांक ०७/०४/२०१८ रोजी लागलेल्या निकालांचा दिनांक ११/०४/२०१८ रोजी होणा-या मतदानावर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

५. वरील बाब विचारात घेता वैजापूर नगरपरिषद व आजरा नगरपंचायत यांच्या अध्यक्ष व सदस्य पदांच्या सार्वत्रिक व रत्नागिरी प्रभाग क्र-३-ब, आळंदी प्रभाग क्र.१-अ,तासगांव प्रभाग क्र.६-अ, दुधनी प्रभाग क्र.४-ब,सावदा प्रभाग क्र.३-ब, कुंडलवाडी प्रभाग क्र.५-ब व कळंब प्रभाग क्र.४ या नगरपरिषदा/नगरपंचायतीमधील रिक्त पदांच्या पोट निवडणुकांची मतमोजणी **दिनांक ०७/०४/२०१८ ऐवजी गुरुवार दिनांक १२/०४/२०१८ रोजी** करण्यात यावी. तरी संबंधित जिल्हाधिकारी यांनी मतमोजणीच्या दिनांकामध्ये झालेल्या बदलाच्या अनुषंगाने प्रसिध्दी देऊन योग्य ती कार्यवाही करावी.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपली,

(री. वि. फणसेकर)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत :-
१. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
३. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
४. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
५. प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
६. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
७. विभागीय आयुक्त, कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद व अमरावती विभाग
८. संबंधित जिल्हा पोलिस अधिक्षक
९. संबंधित नगर परिषदा/नगर पंचायतींचे प्रशासक व मुख्याधिकारी

१०. संचालक, शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालय, चर्नी रोड, मुंबई ४०० ००४
११. सहायक आयुक्त, संगणक कक्ष, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
१२. माहिती व जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
१३. निवड नस्ती (का.६), राज्य निवडणूक आयोग, मुंबई